मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 6 ऑगस्ट 2024 | पान- 1

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पूरग्रस्तांची घेतली भेट

## नागरिकांना सर्वतोपरी मदत करण्याची ग्वाही त्यांनी दिली : निवारा केंद्रातील नागरिकांना त्यांनी जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी (दि.५) जुनी सांगवी येथे पूर परिस्थितीची पाहणी केली. या पुरामुळे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्राथमिक शाळेत स्थलांतरीत केलेल्या नागरिकांशी त्यांनी संवाद साधला. नागरिकांना सर्वतोपरी मदत करण्याची ग्वाही त्यांनी दिली. यावेळी निवारा केंद्रातील नागरिकांना त्यांनी जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले.



यावेळी विधानपरिषद उपसभापती आमदार नीलम गोऱ्हे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार अश्विनी जगताप, आमदार अण्णा बनसोडे, आयुक्त शेखर सिंह, भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप, माजी महापौर माई ढोरे, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, माजी नगरसेवक प्रशांत शितोळे, हर्षल ढोरे, सागर आंगोळकर, संतोष कांबळे, अंबरनाथ कांबळे, बाळासाहेब ओव्हाळ, माजी नगरसेविका शारदा सोनवणे, शिवसेना जिल्हाध्यक्ष बाळासाहेब वाल्हेकर, जयनाथ काटे, कामगार नेते इरफान सय्यद, दिलीप तनपुरे, राहुल जवळकर, शशीकांत दुधारे उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड शहरात अतिवृष्टीमुळे आणि पवना धरणातून सातत्याने होणाऱ्या विसर्गामुळे शहरातील नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाल्याने पवना, मुळा आणि इंद्रायणी नदीवरील घरांमध्ये तसेच सखल भागात पाणी साचल्याच्या घटना घडल्या होत्या. त्याच पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून नदीकाठच्या सुमारे १ हजार नागरिकांना रविवारी महापालिकेच्या वतीने निवारा केंद्रांमध्ये तसेच नातेवाईकांच्या घरी स्थलांतरित करण्यात आले होते.

सध्या पावसाळा सुरू असून पावसाचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात आहे .महानगरपालिकेच्या माध्यमातून महानगरपालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना महानगरपालिकेमार्फत रेनकोट वाटप केलेले नसून सर्व विद्यार्थी भर पावसात शाळेत जातात तरी पिंपरी चिंचवड महापालिकेचे सर्व शाळांमध्ये लवकरात लवकर रेनकोट उपलब्ध करून देण्यात यावे असे हि तरस यांनी नमूद केले आहे



# मुख्यमंत्र्यांसाठी काही बहिणी लाडक्या तर काही बहिणी योजनेपासून वंचित

## राज्यात महिला व बाल विकास आयुक्तालयांतर्गत विविध सरकारी, खासगी संस्थांमधील हजारो निराधार, अनाथ महिला लाडकी बहीण योजनेपासून वंचित आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य सरकार अनेक कल्याणकारी योजना राबवत असल्याची अनेक उदाहरणे आहेत. राज्यात महिला व बाल विकास आयुक्तालयांतर्गत विविध सरकारी, खासगी संस्थांमधील हजारो निराधार, अनाथ महिला मात्र लाडकी बहीण योजनेपासून वंचित आहेत. भिक्षेकरी स्वीकार केंद्रातील महिलांना दिवसभर काम करून पाच रुपये मोबदला मिळतो. दुसऱ्या बाजूला लाडकी बहीण योजनेत राज्य सरकार महिलांना कोणत्याही कामाशिवाय प्रतिदिन पन्नास रुपये अर्थात दीड हजार रुपये महिना देणार आहे. हा विरोधाभास राज्यात दिसून येत असल्याने राज्य सरकारच्या दृष्टीने काही बहिणी लाडक्या तर काही दोडक्या अर्थात नावडत्या असल्याचे दिसून येते.

राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेसाठी युद्धपातळीवर महिलांची नोंद करण्यात येत आहे. या योजनेत जास्तीत जास्त बहिणींना लाभ मिळावा म्हणून राज्य सरकार प्रयत्नशील आहे. त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेतील ग्रामपंचायत, नगरपालिका, नगर परिषदा, जिल्हा परिषद, महापालिकास्तरावर लाडकी बहीण योजनेंतर्गत महिलांची नोंद केली जात आहे. या सर्व धामधुमीत कल्याणकारी सरकार असल्याचा डंका वाजविणाऱ्या सरकारच्या दिव्याखालीच अंधार असल्याचे दिसून येते. राज्यातील महिला व बाल विकास आयुक्तालयांतर्गत सरकारी व खासगी संस्थांमध्ये हजारो निराधार, अनाथ, १८ वर्षांपुढील युवती, महिला, ज्येष्ठ महिला आश्रयाला आहेत. या महिलांकडे मात्र, सरकारचे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. त्यामुळे गरजू व खऱ्या लाभार्थ्यांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळत नसल्याचे वास्तव समोर आले आहे. त्यामुळे या महिलांना लाडक्या बहिणीचा लाभ मिळाल्यास भविष्यात त्यांना फायदा होऊ शकतो.




### कारागृहातील महिलांनाही हवा लाभ

» राज्यातील कारागृहातील महिला कैद्यांनाही लाडकी बहीण योजनेचा लाभ हवा आहे. कारागृहातील, खुल्या कारागृहातील महिलांना आठ तास काम केल्यानंतर ५५ ते ७२ रुपयांपर्यंत प्रतिदिन मजुरी दिली जाते. त्यामुळे महिला कारागृहातील शेकडो महिला कैद्यांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळावा, अशी मागणी केली आहे. याबाबत कारागृह प्रशासनाने कानावर हात ठेवले आहेत. महिला कैद्यांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळू शकत नाही, अशी भूमिका घेतली आहे.

### भिक्षेकरी केंद्रात प्रतिदिन पाच रुपये

» राज्यातील भिक्षेकरी स्वीकार केंद्रात न्यायालयाच्या आदेशाने महिलांना दाखल केले जाते. या महिलांना शिवणकाम, झाडू बनविणे आदी कामे दिली जातात. या कामाच्या मोबदल्यात त्यांना प्रतिदिन पाच रुपये पगार दिला जातो. लाडकी बहीण योजनेंतर्गत महिलांना काम न करता प्रतिदिन पन्नास रुपये अर्थात महिन्याला दीड हजार रुपये दिले जातात. हा विरोधाभास सरकार कसा दूर करणार हा मुख्य प्रश्न आहे. याचे उत्तर आता तरी महिला व बाल विकास आयुक्तालाकडे नाही.

### विद्यार्थिनीही वंचित

» राज्यातील समाजकल्याण विभागांच्या वसतिगृहात अनुसूचित जमाती व अनुसूचित जातीच्या अठरा वर्षांपुढील हजारो युवती आहेत. या युवतींना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळणार की नाही या बाबत समाजकल्याण विभाग संभ्रमावस्थेत आहे. त्यामुळे राज्य सरकारची लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांची व्याख्या अधिक सविस्तर करण्याची आवश्यकता असल्याचे स्वयंसेवी संस्थांचे मत आहे.

# पालिकेसह जिल्हा प्रशासन, अग्निशमन दलाच्या नियोजनामुळे पूरबाधितांना वेळीच पोहोचली मदत

## खडकवासला धरणातून सुरू असलेला पाण्याचा विसर्ग वाढवल्याने नदीकाठच्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते

**पुणे | प्रतिनिधी**

मुसळधार पावसाने पुन्हा हजेरी लावल्यामुळे खडकवासला प्रकल्पातील धरणे चांगलीच फुगली आहे. त्या पार्श्वभूमीवर शनिवारपासून (दि. ३) मुठा नदीपात्रात मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरू करण्यात आला. यामुळे पुणे शहराला पुन्हा एकदा पुराचा फटका बसला असून अनेक नागरिकांच्या घरात पाणी शिरले.

२५ जुलैप्रमाणे यावेळीही पूरस्थिती निर्माण झाली असली तरी पुणे महापालिका, जिल्हा प्रशासनाचे योग्य नियोजन आणि अग्निशमन दलाने तैनात केलेल्या जवानांकडून बाधितांना योग्य वेळी मदत पोहोचणे शक्य झाले. मात्र खडकवासला धरणातून सुरू असलेला पाण्याचा विसर्ग ३५ हजार २ क्यूसेक रविवारी (दि. ४) सायंकाळी ५ वाजता विसर्ग ४५ हजार ७०५ क्यूसेकपर्यंत वाढवल्याने नदीकाठच्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.

पावसाच्या प्रमाणानुसार आणि धरणात पाणी जमा होण्याच्या वेगानुसार विसर्ग कमी/जास्त करण्याची शक्यता असल्याचे पाटबंधारे विभागाने आधीच सांगितले होते, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी खडकवासला धरण ६५ टक्क्यांपर्यंत खाली करण्याचे आदेश जलसंपदा विभागाला दिले आहेत. त्यानुसार विसर्ग वाढवण्यात आला आहे. धरणक्षेत्रात आणि घाटमाथ्यावर मुसळधार पाऊस सुरू असल्याने धरणांच्या पाणीपातळीत चांगलीच वाढ झाली आहे. त्यानुसार पाण्याचा विसर्ग केला जात आहे. नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहण्याचे तसेच काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

पुणे महापालिकेने वेळीच उपाययोजना राबवून ३९५ नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलविले. पुणे जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला होता. शहरासह उपनगरांमध्ये मुसळधार पाऊस झाला. हवामान खात्याकडून शहराला सतर्कतेचा इशारा देण्यात आला होता



### मुख्यमंत्र्यांचे नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्याचे आदेश

» मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ॲक्शन मोडमध्ये आले होते. त्यांनी पुणे जिल्हाधिकारी, पुणे शहर महापालिका आयुक्त आणि आपत्कालीन विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी फोनवरून चर्चा केली होती. ब्लू लाईन म्हणजेच धोकादायक पूररेषेच्या आत राहणाऱ्या सर्व नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच नागरिकांच्या दोन्ही वेळच्या जेवणाची, राहण्याची आणि त्यांना लागेल ती मदत करण्याचे आदेश दिले आहेत.

### असा झाला खडकवासला धरणातून विसर्ग...

» खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदीपात्रात होणारा विसर्ग वाढवून सकाळी ९ वाजता २९ हजार ४१४ क्यूसेक करण्यात आला. सकाळी ११ वाजता हे प्रमाण ३५,००२ क्यूसेक इतके झाले. संध्याकाळपर्यंत पावसाचे प्रमाण वाढले असल्याने पाच वाजता ४५,७०५ क्यूसेक वेगाने पाणी सोडण्यात आले.

# रात्रंदिन आम्हा पुराचीच भीती! मुळा, पवना, इंद्रायणी नद्यांना पूर

## अतिवृष्टी आणि धरणांतून होणारा विसर्ग यामुळे शहरातील मुळा, पवना आणि इंद्रायणी नदीकाठच्या नागरिकांनी रात्र जागून काढली

**पिंपरी | प्रतिनिधी**

अतिवृष्टी आणि धरणांतून होणारा विसर्ग यामुळे शहरातील मुळा, पवना आणि इंद्रायणी नदीकाठच्या नागरिकांनी शनिवारची (ता. ३) रात्र जागून काढली. अनेकांनी नातेवाइकांकडे आश्रय घेतला, तर सुमारे एक हजार नागरिकांना महापालिकेने निवारा केंद्रांमध्ये स्थलांतरित केले.

रविवारीही पाऊस सुरूच राहिल्याने आणि धरणांमधून टप्प्याटप्प्याने विसर्ग वाढविल्याने नद्यांची पाणीपातळी वाढल्याने आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेसह अधिकारी 'ऑनफिल्ड' होते. त्यामुळे 'रात्रंदिन आम्हा पुराची भीती' अशी स्थिती शहरात निर्माण झाली आहे

मुळशी धरणातून मुळा नदीत; पवना व कासारसाई धरणातून पवना नदीत आणि आंद्रा व वडिवळे धरणातून इंद्रायणी नदीत विसर्ग सुरू आहे. शिवाय या तीनही नद्यांच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी होत आहे. त्यामुळे नदी पात्रांमध्ये पाण्याचा येवा वाढल्याने पाणी पातळीतही वाढ झाली आहे..

अतिवृष्टीमुळे पिंपरी-चिंचवड शहरासह नदी काठच्या मावळ, मुळशी, खेड व हवेली तालुक्यांतील गावांना पुराचा धोका निर्माण झाला आहे. नद्यांच्या पूररेषेलगतची आणि सखल भागातील नागरिकांच्या सुरक्षेची काळजी घेण्याचा व त्यांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्याचा आदेश सरकारकडून महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना आला होता.

नागरिकांनीही स्वत:च्या सुरक्षेची काळजी घेऊन प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन शनिवारी केले होते. त्यानुसार महापालिका यंत्रणेकडून शनिवारी रात्रीपासूनच बचाव व मदत कार्य करत आहे.

शहरातील आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी आणि मदत व बचावकार्यासाठी महापालिका आपत्ती निवारण यंत्रणा सज्ज आहे. राष्ट्रीय आपत्ती निवारण (एनडीआरएफ) पथक शहरात दाखल झाले आहे. बॉम्बे इंजिनीअरिंग ग्रुप, औंध ब्रिगेड या यंत्रणाही सज्ज आहेत. आपत्कालीन परिस्थितीवर नियंत्रण ठेवणाऱ्या सर्व यंत्रणा सतर्क आणि सज्ज ठेवल्या आहेत.

सर्व प्रभाग व सर्व अग्निशमन केंद्रांच्या ठिकाणी पुर नियंत्रण कक्ष सुरू आहे. महापालिका भवनामध्ये मध्यवर्ती पूर नियंत्रण कक्ष २४ तास कार्यान्वित आहे. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी पूर नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.



### सतर्क रहा, सूचना पाळा : आमदार महेश लांडगे

» चिखली येथील मोई फाटा, रिव्हर रेसिडेन्सी येथे आमदार महेश लांडगे यांच्यासमवेत आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उपआयुक्त अण्णा बोडदे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल यांनी सखल भागांची पाहणी केली. यावेळी आमदार लांडगे यांनी महापालिकेतर्फे केल्या जाणाऱ्या उपाययोजनांची माहिती घेतली. 'शहरात सातत्याने पाऊस पडत असून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग होत आहे. त्यामुळे नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क रहावे. प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे,' असे आवाहनही त्यांनी केले. तसेच महापालिकेसह सर्व प्रशासकीय यंत्रणांनी आपत्कालीन यंत्रणा दक्ष ठेवून नागरिकांना सर्वतोपरी मदत करावी, अशी सूचना केली.

> इंद्रायणी नदीची पाणी पातळी सध्या कमी आहे. तरी नागरिकांनी सतर्क राहावे आणि आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास महापालिकेच्या आपत्कालीन यंत्रणेस संपर्क साधावा. धोकादायक ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या सुमारे एक हजार नागरिकांना निवारा केंद्र व नातेवाइकांकडे स्थलांतरित केले आहे.
>
> - शेखर सिंह, आयुक्त, महापालिका

> मुळशी धरणाच्या सांडव्यावरून मुळा नदीच्या पात्रात सुरू असलेला विसर्ग सद्यस्थितीत स्थिर आहे. तसेच, पावसाच्या प्रमाणानुसार आणि जलप्रवाहाच्या स्थितीनुसार विसर्ग कमी किंवा जास्त केला जाऊ शकतो.
>
> - बसवराज मुन्नोळी, प्रमुख, मुळशी धरण

> नागरिकांनी नदीपात्रात उतरू नये. नदीमधील पाण्याचे पंप, नदीकाठच्या शेतीतील अवजारे, साहित्य व जनावरे तत्काळ अन्यत्र हलवावीत. सर्वांनी योग्य खबरदारी व दक्षता घेत जलसंपदा विभागास सहकार्य करावे.
>
> - रजनीश बारिया, अभियंता, पवना धरण

# पिंपरी-चिंचवड महापालिकेनंतर आता पीएमआरडीएचा कारभार मराठीत

## सर्व विभागप्रमुखांनी आपले कामकाज मराठीतूनच करण्याच्या सूचना आयुक्त योगेश म्हसे यांनी दिले आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेनंतर आता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणानेदेखील प्रशासकीय कामकाजात मराठीचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व विभागप्रमुखांनी आपले कामकाज मराठीतूनच करण्याच्या सूचना आयुक्त योगेश म्हसे यांनी दिले आहेत. राज्य शासनाच्या परिपत्रकान्वये सामान्य नागरिकांशी केला जाणारा पत्रव्यवहार, सर्व नमुने, पत्रके, परवाने, टिप्पणी, आदेश, परिपत्रके, अहवाल आदी कार्यवृत्तांत मराठी भाषेत असणे आवश्यक आहे. त्याची अंमलबजावणी करण्याच्या सूचना महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी सर्व विभागप्रमुखांना दिल्या आहेत.

प्राधिकरण कार्यालयातील नामफलकावर अथवा पत्रव्यवहारावर एखादी व्यक्ती किंवा अधिकारी तसेच कर्मचारी यांचे नाव मराठी भाषेत लिहिताना इंग्रजी आद्याक्षरांचे मराठीत भाषांतर न करता ती मराठीतूनच लिहावीत. पदनामाचा उल्लेखही मराठी भाषेत असावा. टिप्पणी, आदेश, परिपत्रके व इतर पत्रव्यवहार यावर इंग्रजीमध्ये असणाऱ्या सह्या मराठीतच कराव्यात. निमंत्रणे मराठी भाषेत असणे आवश्यक आहे. आवश्यकता असल्यास मराठी आणि इंग्रजी दोन्ही भाषेतून निमंत्रण पत्रिका असावी. प्राधिकरणाच्या जाहिराती व निविदा किमान दोन मराठी वृत्तपत्रातून प्रसिद्ध कराव्यात. मराठी वृत्तपत्रात दिल्या जाणाऱ्या जाहिराती व निविदा मराठी भाषेत प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. प्राधिकरणाच्या संकेतस्थळावरील माहिती मराठी भाषेत असावी.




### ही कामे होणार मराठीतून

» राजभाषा मराठीचा प्रशासन स्तरावर वापर व्हावा, यासाठी राज्य शासनाने सर्व कार्यालये, महामंडळे यांना मराठीचा वापर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यास अनुसरून पीएमआरडीएच्या कामकाजात राजभाषा मराठीचा वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जनतेशी होणारा पत्रव्यवहार, कार्यालयीन कामकाज मराठीत करावे. सर्व नमुने, पत्रके, परवाने, नोंदवह्या, प्रमाण नमुने, प्रपत्रे, टिप्पणी, नस्त्या व पत्रव्यवहार यावरील शेरे, अभिप्राय, परिपत्रके, अहवाल, बैठकांची कार्यवृत्ते तसेच संकेतस्थळे मराठीत असावेत, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

### आयुक्त डॉ. म्हसे यांच्या सूचना

» संकेतस्थळावर केवळ इंग्रजी भाषेत न ठेवता मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषेत प्रसिद्ध करावी. अधिकारी व कर्मचारी यांनी मराठीचा यथायोग्य वापर करावा. मराठी वापराबाबतच्या सूचनांचे सर्व अधिकारी कर्मचारी यांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

# खेडचे प्रश्न सोडविण्यात लोकप्रतिनिधी अपयशी

## आमदार मोहितेंचे नाव न घेता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अतुल देशमुख यांनी केली टीका

**पुणे | प्रतिनिधी**

खेड तालुक्यात अनेक प्रश्न, समस्या प्रलंबित असून ते सोडविण्यात विद्यमान लोकप्रतिनिधी अपयशी ठरले आहेत, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अतुल देशमुख यांनी आमदार दिलीप मोहिते पाटील यांचे नाव न घेता पत्रकार परिषदेत केली.

अतुल देशमुख म्हणाले, मी 2007 पासून राजकारणात सक्रिय असून तालुक्यातील काही वाईट प्रवृत्ती विरोधात लढा देत आहे. भाजपमध्ये न्याय मिळाला नाही म्हणून शरद पवार गटामध्ये प्रवेश केला. तालुक्यातील अनेक गावाचे सदस्य, सरपंच, पंचायत समिती, जिल्हा परिषद सदस्य आणि तालुक्यातील नागरिक, मतदार माझ्यासोबत आहेत. जे 20 वर्षे माझ्यावर विश्वास ठेवत आले आहेत. त्यांना मला न्याय द्यायचा आहे.



### विधानसभेसाठी मी उमेदवार

» शरद पवारांच्या पक्षात प्रवेश केला; मात्र उमेदवारी संदर्भात त्यांनी कोणताही शब्द दिला नाही. पक्षाकडे मी तिकीट मागणार असून येत्या विधानसभेत मी उमेदवार आहे. माझे काम पाहून शरद पवार हे मला तिकीट देतील असा विश्वास आहे. मला तिकीट नाही मिळाले तरी महविकास आघाडी जो उमेदवार देईल त्याचे प्रामाणिकपणे काम करील.

देशमुख म्हणाले की, खेड तालुका विकासात जेवढा पुढे जायला पाहिजे त्या पद्धतीने विकास झाला नाही. 15 वर्षांत मोहिते यांनी काही काम केले नाही. एमआयडीसीमध्ये अनेक उणीवा ठेवल्या त्या सोडवण्यासाठी विधिमंडळात आवाज उठवला नाही. ठाम आणि ठोस भूमिका घेतली नाही. चाकण वाहतूक कोंडी सोडवली नाही.

एमआयडीसी चे 7 टप्पे झाले मात्र एमआयडीसीत सेवा सुविधा देण्यात अपयशी ठरले. तालुक्यातील तीनही धरणाचे पाणी वाटपाबाबत विधिमंडळात आवाज उठवला नाही. धरणग्रस्तांचे पुनर्वसन रखडलं त्यासाठी आवाज उठवला नाही डावा कालवा अस्तरीकरण, हेड टू टेल, टेल टू हेड काळयावला पाणी सोडण्याबाबत निर्णय घेतला नाही.

खेडचा पूर्व भाग तीन धरणे असूनही आजही तहानलेला आहे. स्थानिकांना रोजगार नाही. याबाबत काहीच उपाययोजना केल्या नाहीत. सेझ परतावा धारकांना सुविधा मिळत नाहीत विमानतळ गेले ते थांबवण्यासाठी का प्रयत्न झाले नाहीत. कांदा बटाटा संशोधन केंद्र आहे त्यावर काही काम झाले नाही. कंपनीत स्थानिकांना काम मिळाले नाही, हे प्रश्न सोडविण्यात मोहिते पाटील अपयशी ठरले असल्याचे देशमुख यांनी नमूद केले.

### या प्रश्नांचा केला ऊहापोह

- शेतकऱ्यांना आरोग्य सुविधा मिळत नाहीत.
- पुनर्वसनाची जमीन शेतकऱ्यांना मिळत नाही.
- शेतकऱ्यांच्या जमिनी कमी भावाने विकली जात आहे.
- एजंटगिरी वाढली आहे.
- खेड तालुक्यात अधिकाऱ्याला पैसे देवून काम करून घ्यावे लागते.
- भ्रष्टाचार करणारे अधिकारी खेड तालुक्यात आले आहेत.
- अनेक गावांत अजूनही पायाभूत सुविधा नाहीत.
- महिलांना रोजगार नाही.
- आदिवासी भागात काहीच रोजगार नाहीत.
- रोजगार प्रशिक्षण नाही कधी त्यांना प्रोत्साहन दिले.
- विजेचे प्रश्न गंभीर आहेत अजूनही आपण 32 केव्हीवर आहे.
- आरोग्याच्या सुविधा नाहीत.

# कऱ्हा- नीरा नदी जोडप्रकल्प राबविणार उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा

## तालुक्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आगामी काळात कऱ्हा व नीरा नदी जोडप्रकल्प राबविणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली

**पुणे | प्रतिनिधी**

तालुक्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आगामी काळात कऱ्हा व नीरा नदी जोडप्रकल्प राबविणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. बारामतीत राष्ट्रवादी शहर काँग्रेसच्या वतीने एक कुटुंब एक झाड या उपक्रमाचा प्रारंभ अजित पवार यांच्या हस्ते झाला.

त्या प्रसंगी त्यांनी या महत्वाकांक्षी प्रकल्पाची घोषणा केली. दरवर्षी पावसाळयात नीरा नदीमध्ये पाणी येथे हे पाणी वाहून जाते, ते पाणी क-हा नदीला आणून मिळविण्यासह मधल्या पट्टयातील तलाव भरुन घेण्याची ही योजना असून बारामतीत रविवारी (दि. 4) संध्याकाळी बोरकरवाडीत होणा-



या कार्यक्रमात याची सविस्तर माहिती देणार असल्याचे पवार यांनी जाहीर केले.

अजित पवार म्हणाले, महायुतीच्या योजनांवर विरोधक चुनावी जुमला म्हणून टीका करतात. अनेक विरोधक खालच्या पातळीवर जाऊन टीका करीत आहेत, आम्ही मात्र सुसंस्कृतपणे विकासाच्या मुद्यावरच भूमिका मांडणार आहोत, कोणीही खालच्या पातळीवर जाऊन टीका करणार नाही, आमच्याकडे विकासाच्या सांगण्यासारख्या योजना असल्याने त्यावरच बोलू.

राज्य सहकारी बँकेबाबत माझ्यावर वाट्टेल ते आरोप करण्यात आले असे सांगून पवार म्हणाले, मी जसा स्वच्छतेचा भोक्ता आहे तसाच सुरवातीपासूनच आर्थिक शिस्त पाळणारा कार्यकर्ता आहे. राज्य सहकारी बँक किंवा पुणे जिल्हा बँक आर्थिक सुस्थितीत आहेत, हेही विचारात घ्यायला हवे. ज्या योजना आम्ही जाहीर केल्या आहेत. त्या कायमस्वरुपी चालविणार आहोत.

### अर्थात ही लोकशाही आहे

» ते म्हणाले की, अर्थात ही योजना पुढे कायमस्वरुपी चालू ठेवायची असेल तर महायुतीच्या उमेदवारांसमोरील बटण दाबावे लागेल असे गंमतीने अजित पवार म्हणाले, लगेच अर्थात लोकशाही आहे, तुम्हाला योग्य वाटेल त्या उमेदवाराला तुम्ही मत देऊ शकता अशी पुस्तीही त्यांनी जोडली.

### लाडकी बहीण कायमस्वरूपी राबविणार

» मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही कायमस्वरुपी राबविणार असून मी गेले दहा वर्षे अर्थमंत्री म्हणून कार्यरत आहे, अडीच कोटी महिला डोळ्यासमोर ठेवूनच ही योजना कार्यान्वित केली आहे, या साठी 46 हजार कोटींची गरज लागणार आहे, अर्थात सरकारने याची तयारी केलेली आहे,